


Scanned by CamScanner

ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - VI Issue - II Marathi March - August - 2018

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**
Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2017 - 4.988
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned by CamScanner

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतातील महिला सशक्तीकरणा संदर्भात सामाजिक व राजकीय आयाम<br>**सौ. सविता रा. शिरपुरकर** | १-४ |
| २ | स्त्री-पुरुष समानतेसाठी मुलभूत विचार व आचाराची गरज : एक विश्लेषण<br>**प्रा. चंद्रप्रभा निकम** | ५-१३ |
| ३ | महिला व वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक आव्हाने<br>**प्रा. लता वसंतराव बावणे** | १४-१६ |
| ४ | नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समाजातील महिलांच्या सबलीकरणात बचतगटाचे योगदान<br>**अर्जुन जोरदार पावरा** | १७-२२ |
| ५ | कोल्हाटी महिलांचा सामाजिक सांस्कृतिक स्थान व दर्जा<br>**सौ. काळे सुप्रिया हेमंतकुमार** | २३-२८ |
| ६ | अभिजात संगीतात महिला कलावंतांचे योगदान आणि बदलते स्वरूप<br>**सौ. स्मिता सुधीर बरवे** | २९-३३ |
| ७ | ग्रामीण भागातील मुलीच्या शैक्षणिक व व्यावसायिक कौशल्यांचा अभ्यास<br>**श्रीमती. अल्का भाऊराव जेऊरकर (ठाकरे)** | ३४-३९ |
| ८ | मध्ययुगीन भारतातील स्त्री शिक्षण<br>**शहाणे सुनिता विठ्ठल** | ४०-४२ |
| ९ | महिला सक्षमीकरणात शासनाचे धोरण<br>**कोमल सुभाष खरात** | ४३-४७ |
| १० | माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची अध्यापन अभिवृत्ती व शिक्षक मूल्य - एक अभ्यास<br>**अनिल पांडुरंग नंदेश्वर** | ४८-५० |
| ११ | विविध क्षेत्रातील स्त्री - पुरूष समानता - एक अभ्यास<br>**अमिना अरमान शेख** | ५१-५४ |
| १२ | महिला सक्षमीकरण<br>**सुवर्णा नितिन ढवळे** | ५५-५८ |
| १३ | महिलांच्या सबलीकरणात कलाप्रदर्शनाची भूमिका<br>**सौ. कविता राजीव कुळकर्णी** | ५९-६१ |




Scanned by CamScanner

VOLUME - VI, ISSUE - II - MARCH-AUGUST - 2018
IDEAL - ISSN 2319 - 359X - IMPACT FACTOR - 4.988 (www.sjifactor.com)

# ५. कोल्हाटी महिलांचा सामाजिक – सांस्कृतिक स्थान व दर्जा

**सौ. काळे सुप्रिया हेमंतकुमार**
संशोधक विद्यार्थीनी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

**प्रस्तावना**

महाराष्ट्राला फार मोठी प्रदीर्घ अशी धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक आणि ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. महाराष्ट्र राज्याच्या इतिहासाचा मागोवा घेतला असता अनेक नामांकित राजघराण्यांनी राज्य केल्याचे दिसते. त्यामुळे राज्यात वेळोवेळी धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय व सामाजिक बदल घडून आले. महाराष्ट्रात अनेक जाती–जमाती, धर्म, पंथ, संप्रदाय इ. विविध प्रकारच्या लोकांचे वास्तव्य फार पूर्वीपासून आढळते. त्यात हिंदू संस्कृतीला विशेष महत्त्व दिलेले दिसते. प्रत्येक धर्म व जातीची वैशिष्टये वेगवेगळी असल्याचे दिसते. या जाती समाज म्हणजेच विशिष्ट समूहाशी बांधलेल्या असतात. मानव हा समाजप्रिय असला तरी समाजापेक्षा तो समूहाला जास्त महत्व देताना दिसतो. दैनंदिन जीवन जगत असताना तो आधार म्हणून समाज किंवा जनसमुदायाशी एकरुप होऊन वागत असतो. अशाच प्रकारे महाराष्ट्रात तसेच संपूर्ण भारतात भटक्या जाती–जमातीत असणारी कोल्हाटी ही एक जात किंवा समाज स्वतःस हिंदू धर्माचा एक अंग किंवा अंतर्भूत घटक म्हणून वास्तव्यास आहे. महाराष्ट्रातील विविध जाती–जमातीतील महिलांचा दर्जा व समस्यांचा अभ्यास करत असताना कोल्हाटी जमातीतील महिलांची सामाजिक व सांस्कृतिक स्थिती मोलाचे योगदान व मार्गदर्शन करते. कोल्हाटी जमात स्वतः भटक्या स्वरुपात आजही आपले जीवन व्यतित करीत आहे. प्रामुख्याने जमातीतील महिला स्वतःच्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी लोकमनोरंजनाच्या माध्यमातून भटकंती करताना दिसते. हिंदू धर्म परंपरेत स्वतःचे अस्तित्व शोधण्याचे प्रयत्न या कोल्हाटी समाजाने आजतागायत केले आहेत. महाराष्ट्रातील विविध धर्म, पंथ, संप्रदाय इ. बाबतीत कोल्हाटी समाजाची धार्मिक परंपरा किंवा स्थिती ही हिंदू धर्म पध्दतीसारखी वाटते. तरीही कोल्हाटी समाज आपले स्वतःचे एक वेगळे अस्तित्व संभाळताना दिसतो.

प्राचीन सांस्कृतिक वारसा लाभलेल्या या भारताला कोल्हाटी जमातीने आपल्या परंपरेतून महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. महाराष्ट्रात मनोरंजन, कला, लोकसंगीत या माध्यमातून आपले वेगळे अस्तित्व निर्माण केले आणि महाराष्ट्रात लोक शिक्षणाची सुरुवात करुन दिली आहे. कलेतून लोकशिक्षण या उक्तीप्रमाणे या समाजाचे कार्य इतिहासात नोंद करण्याजोगे आहे. परंतु खेदाची बाब म्हणजे महाराष्ट्रात दुर्लक्षित, अप्रगत, अशिक्षित,जुन्या रुढी व पारंपारिक व्यवसायाला कवटाळून बसलेल्या स्थितीत आजही आढळतो.

**शोधनिबंधाची उद्दिदटे**

1. कोल्हाटी जमात व कोल्हाटी महिला यांची ओळख करुन देणे.
2. कोल्हाटी महिलांचे वैचारिक व, सामाजिक स्थान स्पष्ट करणे.
3. कोल्हाटी महिलांचे सामाजिक–सांस्कृतिक दर्जा ठरविणे.
4. कोल्हाटी महिलांचे ऐतिहासीक स्थान स्पष्ट करणे.



Scanned by CamScanner

**संशोधनाची गृहितके**

1. कोल्हाटी महिलांचे इतिहासातील योगदान महत्वाचे व मोलाचे आहे.
2. कोल्हाटी महिला लोकमनोरंजनातून समाजात महत्वाचे कार्य करताना दिसतात.
3. कोल्हाटी महिला भारतीय परंपरेत सांस्कृतिक वारसा चालवताना दिसतात.
4. कोल्हाटी महिला उपजिविकेसाठी कलावंत म्हणून अनेक समस्यांना तोंड देतात.

**संशोधनाची पध्दती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे तसेच विश्लेषणासाठी दुय्यम स्त्रोताचा आधार घेण्यात आला. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये कोल्हाटी महिलांचा सामाजिक व सांस्कृतिक दर्जा स्पष्ट करण्यासाठी सर्व प्रथम कोल्हाटी जमातीची ओळख व उगम अभ्यासणे क्रमप्राप्त ठरते.

**कोल्हाटी शब्द व कोल्हाटी जमातीची ओळख**

मराठी शब्दकोश – 2 मध्ये 'कोल्हांट' या शब्दाचा अर्थ हवेतल्या हवेत डोके खाली करुन उडी घेऊन पुन्हा पायावर उभे राहणे म्हणजेच शूरपणाचा देखावा असा दिलेला आहे.

"महाराष्ट्रात कोल्हाटी हा समाज कलावंत समाज म्हणून ओळखला जातो. एकेकाळी भटकणारा, नाचगाणे करणारा, कसरतीचे खेळ करुन गावगाडयातील लोकांची करमणूक करुन उपजिविका करणारा समाज"[1] अशी रामनाथ चव्हाण यांनी त्यांच्या 'भटक्या विमुक्तांची जात पंचायत' खंड–1 मध्ये कोल्हाटी जमातीची ओळख करुन दिली आहे. यावरुन महाराष्ट्रात कलावंत म्हणून ओळखली जाणारी कोल्हाटी जमात प्राचीन काळापासून नृत्य करणे, कसरतीचे व शूरपणाचे खेळ करणे, जनतेचे मनोरंजन करणे असे मोलाचे कार्य करताना दिसते.

**कोल्हाटी महिलांची ओळख**

कोल्हाटी जमातीच्या विविध वैशिष्टयांमध्ये लक्ष वेधून घेणारे वैशिष्टय म्हणजे कोल्हाटी जमातीतील स्त्री. तिलाच नायकीण, कलावंतीण म्हणून ओळखले जाते.

"कोल्हाटी कसरतीचा खेळ, नाच तमाशा करतात त्यांच्या नायकिणी कसब करतात"[2] असे वर्णन त्रिं. ना. अत्रे आपल्या 'गावगाडा' या ग्रंथात कोल्हाटी स्त्रीविषयी करतात. तसेच प्रभाकर मांडे यांच्या 'गावगाडयाबाहेर' या ग्रंथातील निर्देशावरुन कोल्हाटी स्त्रीच्या मनोरंजनाचे स्वरुप लक्षात येते, "विशिष्ट प्रकारची उडी डोके खाली करुन एक चक्कर मारुन पुन्हा पायावर उभे राहण्याच्या उडीला कोल्हाट किंवा कोल्हाटी उडी असे म्हणतात".

वरिल संदर्भावरुन असे लक्षात येते की, हा समाज लोक मनोरंजनासाठी व उपजिविकेसाठी किती धडपडतो. तसेच कोल्हाटी महिलांचा शूरपणा या संदर्भातून व्यतीत होतो. स्वतःचे व स्वतःच्या कुटुंबाचे पालन–पोषण व्हावे यासाठी अनेक घातक प्रसंगांना सामोरे जाण्याची तयारी कोल्हाटी स्त्रीची असते. कोल्हाटी कुटुंबातील अनेक सदस्य आर्थिक उत्पन्नासाठी खेळ करतात. लहान वयातच मुले–मुलींना नृत्य, कला, खेळ यांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे संपूर्ण कुटुंब आर्थिक उत्पन्नाचे साधन बनू शकते. एक गावावरुन दुसऱ्या गावी खेळ करीत जावे व उत्पन्न मिळविणे अशी अवघड परिस्थिती या समाजावर पडल्याची दिसून येते.



Scanned by CamScanner

**कोल्हाटी जमातीचे स्थान व उगम**

कोल्हाटी जमातीचे स्थान व उगमाबाबत विविध अभ्यासकांच्या मतांमध्ये साम्य व भेद दिसून आला आहे.

“कोल्हाटी अथवा गारुडी यांची 1901 साली पुरुष–1,922 व स्त्रिया–2,639 ही संख्या डेक्कन, कर्नाटक, कन्नर, कोलाबा, ठाणा याठिकाणी होती. त्याबरोबर 4,611 हिंदूपैकी 1901 मध्ये 68 महंमदमध्ये परतले. कोल्हाटी समाज कर्नाटकमध्ये डोंबारी व अहमदनगर मध्ये खेळकरी म्हणून ओळखला जातो”[3]

R. E. Enthoven (1990) यांनी आपल्या ‘The Tribes & Caste of Bombay’ या ग्रंथात कोल्हाटी जमातीची कर्नाटकमध्ये ‘डोंबारी’ व अहमदनगरमध्ये ‘खेळकरी’ अशी ओळख सांगितली आहे. “उत्तर भारतामध्ये मथुरेच्या आसपास कोल्हांटयाप्रमाणे कसरतीचे प्रयोग करुन उपजिविका करणारे लोक आहेत. त्यांना ‘नट’ या नावाने ओळखले जाते”[4] रामनाथ चव्हाण 2002 यांनी खंड–1 मध्ये कोल्हाटी जमात ही उत्तर भारतात ‘नट’ नावाने ओळखली जाते असे सांगितले तर वरीलप्रमाणेच मराठी विश्वकोष खंड–4, 1985 नुसार कोल्हाटी जमातीचे स्थान कर्नाटक व मध्य प्रदेशात आढळल्याचे सांगितले आहे. तसेच महाराष्ट्रात यांना दांडेवाले, कबुतरी, खेळकरी, डोंबारी, कोल्हाटी, बांसबेरिया इ.नावाने ओळखले जाते.

**कोल्हाटी जमातीतील महिला कलावंतीणीचे सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थान व दर्जा**

कोल्हाटी जमात बहुसंख्येने कलेच्या क्षेत्रात व्याप्त असल्याने जमातीतील प्रामुख्याने स्त्री–कलावंतीनीने समाजासाठी कला सादरीकरणाची भूमिका परंपरागत पध्दतीने पुढे चालविलेली आहे. फार पूर्वीपासून ज्यावेळी कला अप्रगत अवस्थेत होती अशा काळापासून ही कलावंतीण कलेशी एकनिष्ठ आहे. त्यामुळे कला सादरीकरण आणि कोल्हाटी समाज असे समीकरण तयार झाल्याचे आढळून येते. एवढेच नाही तर प्राचीन काळातील नृत्य, मनोरंजन, नर्तिका, गणिका अशा विविध संदर्भामध्ये कोल्हाटी स्त्रीची वैशिष्टये व सहसंबंध पाहावयास मिळतो तो पुढीलप्रमाणे–

**1. गीतेतील मुक्ती व मोक्षमार्ग बाबत प्रतिपादन**

ज्याला वासनेपासून परावृत्त व्हावे असे वाटते तो केवळ आपल्या आवश्यक तेवढया गरजा भागविण्याचा प्रयत्न करतो. अशाप्रकारे केवळ देह जगविण्यासाठी, गरजा भागविण्यासाठी ज्यास समाधान वाटते त्याला कधीही स्वतःची लाज व तिरस्कार वाटणार नाही. आपल्या गरजा भागविणे अपरिहार्य असल्यास त्या किमानपक्षी भागतील व त्यांचा व्यत्यय मोक्ष प्राप्तीस येणार नाही याची दक्षता त्याने घ्यावयास हवी. गीतेमध्ये उल्लेखानुसार हिंदू लोकजीवांचे पुढील 8 वर्ग मानतात.

1. देव– हे उत्तरेकडे राहतात (हिंदूचेच खास)
2. दैत्य व दानव– दक्षिणेकडे राहतात. हिंदूंना विरोध करतात. गाईचा छळ करतात. देव–दानव संघर्ष
3. गंधर्व–देवांच्या गायकांचा वर्ग, प्रसंगी ज्या नर्तिका नृत्य करतात त्यांना अप्सरा असे म्हणतात.
4. यक्ष– देवांच्या संपत्तीचे रक्षण करणारा वर्ग
5. राक्षस–अत्यंत कुरुप व ओंगळ
6. किन्नर– मानव देहावर घोडयाचे शिर ठेवल्यास जशी आकृती दिसते त्याप्रकारचे रुप
7. नाग– हे सर्पासारखे दिसतात.



Scanned by CamScanner

8. विदयाधर – हे मंत्र तंत्र करतात व त्यांना चेटूक करण्याची अघोरी विद्या प्राप्त[5]

वरील गीतेतील प्रतिपादनानुसार गंधर्व वर्गामध्ये गायक, नर्तिका व अप्सरा यांचा समावेश होता व हा प्राचीन वारसा चालवण्याचे बहुमोल कार्य कोल्हाटी जमातीची कलावंतीन करताना दिसते.

**2) कलावंतीनीचे स्थान आदर व मानाचे**

प्राचीन भारतात मौर्य वंशाला महत्वाचे स्थान आहे. कोल्हाटी जमातीचे अस्तित्व व कलावंतीनीचे स्थान प्राचीन काळापासून महत्वपूर्ण असल्याचे दिसते.

**1. गणिका[6]**– तत्कालीन समाजात पुरुषांचे मनोरंजन करणारा स्त्रियांचा जो वर्ग होता त्याला गणिका म्हणत. आजच्या वेश्यांपेक्षा गणिका आपल्या नृत्य–गायनाने आणि मोठया चार्तुयाने पुरुषांचे मन राखीत असत. गणिकांना समाजात मानाचे स्थान असल्याचे दिसते.

**2. गणिकांचे गुप्तहेर म्हणून कार्य[7]**– त्याकाळात वेश्यांना व्यवसायासाठी परवानगी काढावी लागे. सर्वात सुंदर गणिकेला या व्यवसायाची देखरेख करण्यासाठी नियुक्त केले जात असे. तिला दरमहा पगार दिला जाई. समारंभप्रसंगी तिला राजदरबारात हजेरी लावावी लागे. सुंदर गणिकांचा उपयोग शत्रूपक्षाकडील माणसे फोडून बातम्या काढण्यासाठी करण्यात येई. समाजात गणिकांना उच्च स्थान होते. गौतम बुध्दाने बुध्दकालीन प्रसिध्द वारांगना आम्रपाली हिच्या घरी जाउन आदरतिथ्य स्वीकारल्याचे प्रसिध्द दाखले देता येतील.

जी.बी.शहा (द्वि.आ.2013) यांनी मांडलेल्या माहितीनुसार गणिका या गुप्त काळामध्ये नृत्य निपुन असून गुप्तहेर म्हणूनही मोलाचे कार्य करीत होत्या. कोल्हाटी जमात कलावंत जमात असल्याने कोल्हाटी कलावंतीण स्त्री व जमातीचा पारंपारिक व्यवसाय प्राचीन काळात मनोरंजनाचे महत्वाचे साधन मानले जात होता. इतिहासामधील दाखल्यांनुसार नृत्य, मनोरंजन, गायन, वादन यांना मानाचे व आदराचे स्थान होते.

**कोल्हाटी कलावंतीण स्त्री विषयक दृष्टीक्षेप**

कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असताना स्त्री व पुरुष आप–आपल्यापरीने कुटुंबाला आर्थिक आधार देण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु मराठी शब्दकोष खंड–2 मध्ये कोल्हांटीण दोरीवर कसरत करणाऱ्या भिक्षेकराची एक जात असा कोल्हाटी स्त्रीविषयी अर्थ दिला आहे. यावरुन कोल्हाटी जमातीतील कोल्हांटीण ही या कसरतीच्या खेळातील तसेच नृत्य प्रकारातील प्रमुख असते. प्रत्येक भटक्या जमातीत स्त्रीला दुय्यम स्थान दिले गेलेले आहे. अपवाद केवळ कोल्हाटी समाजातील स्त्रीचा आहे. कोल्हाटी जमातीतील आर्थिक भार हा बहुतांशी भागामध्ये स्त्रीच्या डोक्यावर असल्याचे अनेक ठिकाणी उल्लेख केल्याचे दिसते. सदयस्थिती काही प्रमाणात बदललेली असली तरीही सांस्कृतिक पार्श्वभूमी अभ्यासताना कोल्हाटी स्त्रीची अर्थकारणातील भूमिका लक्षात घ्यावी लागते. कोल्हाटी कलावंतीण स्त्रीला नायकीन असेही संबोधले जाते. "भटकत राहणारे लोक कलाकौशल्यातून खेळ दाखवून पैसे मिळवितात. मिळालेल्या देणगीच्या पैशात स्वतःचे व कुटुंबातील सदस्यांचे पालन–पोषण करण्याची जबाबदारी खेळ करणाऱ्या किंवा कर्त्या व्यक्तिवर अवलंबून असते. या समाजातील खेळ दाखविणारे लोक हातचलाखी, झटपट हालचाली, काठी फिरविणे, आकर्षक उडया मारणे, स्वतःचा जीव धोक्यात ठेवून दोरीवर चालणे, वादयाचा वापर करुन हात चालविणे, खेळात नावीण्य आणून जमाव जमविणे, प्रेक्षकांना खूश करुन देणगीच्या रुपात पैसा मिळविणे व यासर्व कटकटी



Scanned by CamScanner

करुन स्वतःचे पोट भरतात. खेळातील धोका, समस्या, जीवावरील संकट, खेळातील दुखापत या सर्व अडचणींचा हसतमुखाने सामना करत इतरांना खुश करुन चार पैसे मिळविण्याचा प्रयत्न हा समाज करत असतो"[8]

सतीशकुमार जाधव (2010) यांनी आपल्या 'कोल्हाटी समाज आणि संस्कृती' या ग्रंथामध्ये कोल्हाटी कलावंतीण स्त्रीच्या उपजिविकेसाठीच्या धडपडीचे वर्णन केले आहे. अनेक संदर्भावरुन असेही दिसून येते की, प्रत्येक कोल्हाटीण स्त्री ही नायकीण किंवा कलावंतीन नसते. तिला वयात आल्यावर तिच्या मर्जीनुसार हा पारंपारिक व्यवसाय स्वीकारण्याची अनुमती दिली जाते. म्हणजेच या जमातीमध्ये गृहिणी कोल्हाटी स्त्री व कलावंतीण कोल्हाटी स्त्री असे दोन प्रकार पडतात. कलावंतीण स्त्री म्हणून जीवन जगत असताना या महिलांना अनेक समस्या व आव्हानांना तोंड दयावे लागते.

**कोल्हाटी कलावंतीण स्त्रीच्या समस्या[9]**

1. कलावंतीण स्त्रीला जातीव्यवस्था व परंपरा या चौकटीमुळे उदरनिर्वाहासाठी भटकंती करावी लागते.
2. समाजातील सर्व बरे–वाईट अनुभव पदरी बांधून हा समाज भटके जीवन जगतो.
3. या व्यवसाय व जीवन जगण्याच्या पध्दतीत कलावंतीणीला अनेक श्रीमंत व पैसेवाल्या लोकांकडून अपमानास्पद वागणूक मिळते.
4. या स्त्रीला भाऊ, बहिण, आई, वडील इ.चा सांभाळ करणे बंधनकारक असल्याने संसार करण्यास वाव मिळत नाही.
5. पारंपारिक व्यवसाय व जातीव्यवस्थेची बंधने यामुळे कलावंतीणीचे विवाहाचे स्वप्न शक्य होत नाही.
6. भटकंती करत जीव मुठीत घेऊन प्रेक्षकांना खुश ठेवूनही या महिलांना मुलभूत गरजा भागविण्याइतके उत्पन्न मिळत नाही.
7. पूर्वी नृत्य व कला यांना असणारा मान व आदर समाजाकडून आता तिरस्काराच्या भावनेत बदलत आहे.

**निष्कर्ष**

1. महाराष्ट्रात कोल्हाटी जमात 'कलावंत' म्हणून ओळखली जाते.
2. उत्तर भारतात या जमातीला 'नट' म्हणून ओळखले जाते.
3. प्राचीनकाळी कोल्हाटी पारंपारिक व्यवसायाचे सामाजिक–सांस्कृतिक स्थान आदर व मानाचे होते.
4. इतिहासकाळात कोल्हाटी कलावंतीण स्त्री चा दर्जा व योगदान महत्वपूर्ण होते.
5. कोल्हाटी महिलांमध्ये दोन प्रकार पडतात. एक गृहिणी कोल्हाटी स्त्री व दुसरी कलावंतीण कोल्हाटी स्त्री.

**संदर्भ सूची**

1. रामनाथ चव्हाण 'भटक्या विमुक्तांची जातपंचायत' खंड–1, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 5 मार्च 2002 ,पृ.क.71
2. त्रिं. ना. अत्रे, 'गावगाडाबाहेर', वरदा बुक्स, पुणे प्र. आ.1915, तृ.आ.1989, पुर्नमुद्रण 1995, पृ.क.15
3. R. E. Enthoven, 'The Tribes & Castes of Bombay' Asian Education services, New Delhi, F.P. 1922, Re.p.1990, P.No.237.



Scanned by CamScanner

4. रामनाथ चव्हाण, उ.नि.पृ.क.71 2002
5. अलबेरुनी, 'अलबेरुनीचा' भारत खंड–1ला, साहित्य ॲकॅडमी, नवी दिल्ली, प्र. आ.1986, द्वि.आ. 2006, तृ. आ. 2009, पृ. क. 67
6. जी. बी. शहा, 'प्राचीन भारताचा राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास', प्रशांत प्रकाशन, जळगांव, द्वि.आ. 2013, पृ. क. 302
7. तत्रैव, पृ.क.111
8. सतीशकुमार जाधव, 'कोल्हाटी समाज आणि संस्कृती', लोकविद्या प्रकाशन, परभणी, प्र.आ.2010, पृ.क.72
9. किशोर काळे, 'कोल्हाटयाचं पोर', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र.आ.1994, पुर्नमुद्रण 2009, पृ.क.8,12



Scanned by CamScanner